**Note # 1**

सादर:
दि. २४/०२/२०२६

विषय :- एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्याबाबत.
संदर्भ :- १.शासन निर्णय क्र.**CAT/2017/PK 08/Bldg.-2** दि. २७/०९/२०१८
२. मुं.म.प्र.वि. प्राधिकरणाचे पत्र क्र. टिसीपी (पी-२)बीकेसी/संकीर्ण/ १६०६/१९२८/२०२५ दि. ०२/१२/२०२५ चे पत्र
३. मे. आयएलएफ कन्सल्टिंग इंजिनिअर्स (बोलीदार) यांचा दि . २१/०२/२०२६ चा ई-मेल

.................

मंडळाचे प्रस्तावित "पर्यावरण भवन" उभारण्याकरता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा कडून खरेदी करण्यात येत असलेल्या बांद्रा-कुर्ला संकुल येथील भुखंड क्र. C-79 करता एकूण लीज प्रीमिअमच्या २५ टक्के रक्कम रुपये १२८,८६,५३,५८०.५०/- (एकशे अठ्ठावीस कोटी शहाऐंशी लाख त्रेपन्न हजार पाचशे ऐंशी आणि पन्नस पैसे फक्त) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास मंडळाने अदा करण्यात आली असून भखंडाची उर्वरीत ७५% रक्कम रुपये ३८६,५९,६०,७४१.५०/- (तीनशे शहाऐंशी कोटी एकोणसाठ लाख साठ हजार सातशे एक्केचाळीस आणि पन्नस पैसे फक्त) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास लवकरच अदा करण्याचे प्रस्तावित आहे.

उक्त भूखंड खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भूखंडाची पहाणी व मोजमाप क्र उभारवयाच्या इमारतीचे नियोजन,आराखडे व खर्चाचे अंदाजपत्रक, दर सुची, होणारी काम े व त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचे मुल्यांकन/तपासणी करणे, इमारतीच्या बांधकामाचे निरिक्षण/परिक्षण करणे, त्याकरता विविध शासकीय संस्थाकडून मिळवावयाचे आवश्यक परवाने/ परवानग्या इत्यादी कामांसाठी लागणारे आवश्यक पुरेसे मनुष्यबळ मंडळाकडे उपलब्ध नसल्याने उक्त जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी या प्रकारच्या सेवा पुरविणाऱ्या अनुभवी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची नेमणूक करण्याचा निर्णय मंडळाच्या १८६ व्या बैठकीत घेण्यात आला आहे.

त्याअनुशंगाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्याकडुन स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्याकरीता तयार करण्यात आलेली ई- निविदा शासनाच्या महा टेंडर या संकेतस्थळावर **दि. ३०/०१/२०२६** पासून ई-निविदा क्र. **2026_MPCB_1273091_1** प्रसारीत करण्यात आली आहे. सदर निवीदेच्या अनूसुचीनुसार**दि. ०६/०२/२०२६** रोजी मुख्यालयात पार पडलेल्या प्री-बीड बैठकी दरम्यान संस्थाव्दारे विचारण्यात आलेले आलेले मुद्दे व शंका यांचे लेखा अधिकारी, कार्यकारी अभियंता यांच्या व्दारे निरसन करण्यात आले व सदर बैठकीचे इतीवृत्त मंडळाच्या तसेच शासनाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आले आहे.

उक्त निवीदेच्या अनूसुचीनुसार बोली सादर करण्याचा कालावधी **दि. २३/०२/२०२६** रोजी सायंकाळी **५:०० वाजेपर्यंत** असल्याने सदरचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर निवीदेस प्राप्त झालेल्या प्रतिसादाची तपासणी केली असता **फक्त १ (एक) बोली** प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच संदर्भिय क्र. ३ ई-मेल व्दारे मे. आयएलएफ कन्सल्टिंग इंजिनिअर्स (बोलीदार) यांनी निवीदेचा कालावधी ३ (तीन)आठवडयाने वाढविण्याबाबत विनंती केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **शासन निर्णय क्र.CAT/2017/PK 08/Bldg.-2 दि. २७/०९/२०१८** च्या मार्गदर्शक तत्वातील **अनु क्र. ४.३** नुसार स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी किमान ३ (तीन) बोलीदारांचा प्रतिसाद प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्याअनुशंगाने प्राप्त प्रतिसाद पुरेसा नसल्या कारणाने निविदेचा कालावधी वाढविणे आवश्यक असून उक्त मार्गदर्शक तत्वातील **अनु क्र. २.१ नुसार** निवीदेस पुढील किमान २५ दिवसांचा कालावधी (Second Call) देणे



File No. MPCB-13/30/2026-O/O MEMBER SECRETARY-MPCB (Computer No. 3083063)
Generated from eOffice by yogesh dongre, Senior Clerk Yogesh Dongre, SENIOR CLERK , MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD MUMBAI on 24/02/2026 05:09 PM

शक्य असल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता,सदर निविदेकरीता प्राप्त झालेला अल्पत्य प्रतिसाद पाहता उक्त निवीदेस  मुदत वाढ देणे आवश्यक असल्याने संदर्भिय क्र. १ अन्वये शासन निर्णयास अनुसरुन निवदीदेस मुदत वाढ देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्ताव वरिष्ठांच्या अवलोकनार्थ सादर.

PWD_Guidelines_E-Tendering_Process_27092018_English.pdf
RFP PMC.pdf
Bid count.pdf

**24/02/2026 03:58 PM**

**Bhalachandra Jagtap**
**EXECUTIVE ENGINEER**

---

**Note # 2**

Approvedमान्य करण्यात येते आदेश निर्गमित करावे

**24/02/2026 05:01 PM**

**M Devender Singh**
**MEMBER SECRETARY**

---

**Note # 3**

**24/02/2026 05:07 PM**

**Bhalachandra Jagtap**
**EXECUTIVE ENGINEER**

---



File No. MPCB-13/30/2026-O/O MEMBER SECRETARY-MPCB (Computer No. 3083063)
Generated from eOffice by yogesh dongre, Senior Clerk Yogesh Dongre, SENIOR CLERK , MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD MUMBAI on 24/02/2026 05:09 PM